दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ९१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, बुधवार, दि.१३ नोव्हेंबर २०२४




## महायुतीला मत म्हणजे गुजरातला मत : उद्धव ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, लातूर :** उद्धव ठाकरेंनी औसा या ठिकाणी भाषण करताना महायुतीवर कडाडून टीका केली. उद्धव ठाकरे म्हणाले, की मी ऐकलं अमित शाह म्हणाले की पुन्हा सत्ता आल्यानंतर देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होणार. मग मिंध्यांना म्हणा की आता भांडी घास. अजित पवारांना म्हणावं की मिंध्यांना ती भांडी घासायला माती द्या. बसा दोघं भाजपाची भांडी घासत. मोदी पंतप्रधान पदाच्या खुर्चीवर बसायला लायक नाहीत. अमित शाह हे गृहमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसायला लायक नाहीत. कारण तुम्ही तुमचं काम सोडून प्रचारासाठी फिरत आहात. महाराष्ट्र आता तुमच्या थापांना कंटाळला आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. औसा या ठिकाणी उद्धव ठाकरेंची सभा पार पडली, या सभेत उद्धव ठाकरेंनी भाजपावर जोरदार टीका केली.



**उद्धव ठाकरेला संपवलं आहे तर त्याला अजून का घाबरता?**

उद्धव ठाकरेला जर तुम्ही संपवलं आहे तर त्याला अजून का घाबरता? असा सवाल उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान मोदींना विचारला आहे. मला सोलापूरला जायचं होतं पण तिथलं एअरपोर्ट बंद आहे. ही काय लोकशाही आहे का? माझी बॅग जर तपासली जात असेल तर मोदी आणि शाह यांचीही बॅग तपासली पाहिजे. माझी येताना बॅग तपासता तशी मोदी शाह यांची जाताना बॅग तपासा. यांना मतदान करुन आपल्या चक्रव्युहात अडकू नका. महायुतीला मत म्हणजे गुजरातला मत असं म्हटलं तर काय चुकीचं बोललो? आम्ही शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु वगैरे पान्हा फुटला आहे. आता कशाला आठवण आली? आम्ही केलं होतं शेतकऱ्यांना कर्जमुक्त. पिक वीमा मिळत नाही पण जीएसटी कचकून घेत आहेत. काही लोकांना २७ रुपयांचा चेक आला. ५१ रुपयांचा चेक, १२३ रुपयांचा चेक हा यांचा पीक विमा. अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली. देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ, तिघं मिळून महाराष्ट्र लुटून खाऊ

देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ तिघं मिळून महाराष्ट्राला लुटून खाऊ हे यांचं धोरण आहे. मिंधेंनी तर ताळतंत्र सोडून दिलं आहे. जाऊ तिथे खाऊ हेच त्यांचं धोरण आहे. दीड वर्षापूर्वी पंतप्रधान आले होते आणि रस्त्याच्या कामांचा शुभारंभ केला. आपण केलेल्या कामांवरच ते नारळ फोडले. ते काम किती हजार कोटींनी वाढलं ते बघा. सगळे पैसे एकनाथ शिंदेंच्या कंत्राटदारांच्या खिशात जात आहेत. तुम्ही ठरवायचं आहे की तुम्ही तुमच्या मुलांचं भवितव्य दरोडेखोरांच्या हाती देणार की निष्ठावान मावळ्यांच्या हातात देणार? महाराष्ट्र काय म्हणून ओळखला गेला पाहिजे शिवरायांचा स्वाभिमानी महाराष्ट्र की अदाणीचा लाचार महाराष्ट्र हे तुम्ही ठरवायचं आहे. असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**महाराष्ट्र मोदी-शाह यांना दिल्लीत बसून हाकता येणार नाही**

महाराष्ट्र दिल्लीत बसून मोदी-शाह यांना हाकता येणार नाही हे लक्षात ठेवा असंही उद्धव ठाकरेंनी औसा येथून भाजपाला ठणकावलं. मोदी आणि शाह महाराष्ट्र संपवायला निघाले आहेत. महाराष्ट्र लुटण्याच्या आड कुणी येऊ शकत असेल तर ती फक्त हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुखांची शिवसेना आहे. त्यांनी शिवसेनेवर घाव नाही घातलेला तर महाराष्ट्राच्या मूळावर घाव घातला आहे अशीही टीका उद्धव ठाकरेंनी केली.

## 'मतदान' राष्ट्रीय कर्तव्याचे पालन करा - सहाय्यक बीडीओ प्रकाश बोंबले

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१२, खंडाळा (सातारा) :** राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय,सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा व स्वीप मतदान जनजागृती अभियान खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जागृती रॅली व मानवी साखळी आयोजन करण्यात आले.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.हणमंत जाधव व प्राचार्य शब्बीर नालबंद यांच्या हस्ते करण्यात आले. सहाय्यक गटविकास अधिकारी पं.स.खंडाळा प्रकाश बोंबले म्हणाले-महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करिता भारतीय निवडणूक आयोगाने मतदान टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप कार्यक्रम अंतर्गत प्रबोधन सुरु केले आहे. प्रामुख्याने मतदार जागर रथ गावोगावी फिरत असून शाळा महाविद्यालय सहभागी होत आहेत.



आपल्या शैक्षणिक संकुलाने सक्रिय सहभाग घेतला, मतदान राष्ट्रीय कर्तव्यात सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले.

गटशिक्षणाधिकारी गजानन आडे म्हणाले- मतदान ही प्रत्येक स्त्री पुरुषाची नैतिक जबाबदारी असून कोणीही यापासून वंचित राहणार नाही यासाठी मतदान जनजागृती व्हावी

ज्ञानेश्वर ढमाळ व सहकाऱ्यांनी रेखाटलेक्या भारत नकाशात वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ विद्यालय विद्यार्थ्यांनी मानवी साखळी केली होती. प्रास्ताविक व परिचय रतिलाल गावित,आभार धनंजय महामुनी, सूत्रसंचालन प्रा.अमीर इनामदार यांनी केले. यावेळी महिला व बालकल्याण अधिकारी छाया मिठारी, शिक्षण विस्तार अधिकारी रमेश यादव, केंद्रप्रमुख सुनिता साबळे, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, डॉ.प्रतिभा पाटणे शिक्षक, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रंथपाल हणमंत यादव, बाळू गाढवे, गेनबा चव्हाण, किशोर तळेकर, भागवत बिरगड यांनी परिश्रम घेतले.

## काँग्रेसची मानसिकता गुलामगिरीची... पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पुणे :** काँग्रेसची मानसिकता गुलामगिरीची आहे. त्यांनी नेहमीच महाराष्ट्राचा अपमान केला आहे. काँग्रेसने सत्तेसाठी कायम तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. आताही काँग्रेसकडून दलित, आदिवासी आणि मागासवगर्यीय समाजातील एकजूट तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळेच आपण एक राहू तर सेफ राहू, असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं आहे. तसेच हिंमत असेल तर उद्धव ठाकरेंनी काँग्रेसच्या युवराजांकडून वीर सावरकर, बाळासाहेब ठाकरे यांची प्रशंसा करून दाखवावी, असं आव्हान देत त्यांनी उद्धव ठाकरेंनाही लक्ष्य केलं.



**काय म्हणाले नरेंद्र मोदी?**

काँग्रेसने कर्नाटक विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. तिथे रोज घोटाळे समोर येत आहेत. जनतेचा लुटलेला पैसा काँग्रेसकडून महाराष्ट्रातील निवडणुकीत वापरला जातो आहे. आम्ही जनतेच्या पाठिंब्याने जम्मू काश्मीरमधून कलम ३७० रद्द करून दाखवलं. पण काँग्रेस आता ते परत लागू करण्याच्या प्रयत्नात आहे. काँग्रेस पक्ष आता पाकिस्तानची भाषा बोलू लागला आहे, अशी घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

**काँग्रेसची मानसिकता गुलामगिरीची**

काँग्रेसची मानसिकता गुलामगिरीची आहे. त्यांनी नेहमीच महाराष्ट्राचा अपमान केला आहे. काँग्रेसने सत्तेसाठी कायम तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. आताही काँग्रेसकडून दलित, आदिवासी आणि मागासवगर्यीय समाजातील एकजूट तोडण्यचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, जनतेने त्यांच्यापासून सावध रहायला हवे. एक रहेंगे तो सेफ रहेंगे, असेही ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी उद्धव ठाकरेंनाही लक्ष्य केलं. हिंमत असेल तर उद्धव ठाकरेंनी काँग्रेसच्या युवराजांकडून वीर सावरकर, बाळासाहेब ठाकरे यांची प्रशंसा करून दाखवावी, असं आव्हान त्यांनी दिलं.

**महायुती आहे तरच महाराष्ट्राची गती आहे**

महायुती आहे तरच महाराष्ट्राची गती आहे. तरच प्रगती आहे. महायुती सरकारने राज्यात अनेक विकासकामे केली आहेत. महिलांच्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या. लाडकी बहीण योजनेची चर्चा संपूर्ण देशभरात सुरू आहे. मात्र, काँग्रेस ही योजना बंद करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी त्यांची लोक न्यायालयातही गेली आहेत. पण काहीही झालं तरी ही योजना बंद होणार नाही. आगामी काळात महायुती सरकार राज्यात वेगाने विकासकामे करणार आहे, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

## गुहागर मतदारसंघात मनसेच्या प्रचाराला वेग



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, गुहागर :** गुहागर विधानसभा मतदारसंघात प्रमोद गांधी यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू असून नुकतीच गुहागर मध्ये राजसाहेब ठाकरे यांची सभा झाल्यानंतर मनसे पदाधिकारी जोमाने प्रचाराला लागले आहेत,मनसे उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष प्रसाद कुष्टे, जानवळे शाखा अध्यक्ष सुशांत कोलंबेकर आदी पदाधिकारी आणि मनसे कार्यकर्ते घरोघरी जाऊन प्रचार करताना

## साकूर सराफा दरोड्यातील दोघांच्या मुसक्या आवळल्या

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, संगमनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील साकूर येथे काल दुपारी पाच दरोडेखोरांनी बंदूकीचा धाक दाखवत सोन्याच दूकानच लूटून नेल्याची घटना घडली होती. विशेषतः भरदिवसा गजबजलेल्या ठिकाणी ही घटना घडल्याने साकूरमध्ये एकच खळबळ उडाली होती. तसेच हा संपूर्ण थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. तसेच दूकानाबाहेर येऊन या दरोडेखोरांनी हवेत फायरिंग करत तेथूनच पसार झाले होते. या दरोडेखोरांना पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेसह पोलिसांच पथक रवाना झाले होते. दरम्यान पाच दरोडेखोरांपैकी दोन दरोडेखोराला पारनेर तालुक्यातील वारणवाडी – जांभुळवाडी परिसरातून जेरबंद करण्यास पोलिसांना यश आल्याची माहिती समोर आलीय. यापैकी एक दरोडेखोर बारामतीचा असल्याची माहिती समोर आलीय. तसेच मोटारसायकल ही ताब्यात घेतल्या आहेत. उर्वरित ३ दरोडेखोरांचा शोध सुरू आहे. दरम्यान सदर दरोडेखोर डोंगरात लपून बसलेली माहिती पोलिसांना मिळाली होती. मात्र घटनास्थळापासुन २५ किलोमीटर अंतरावरच वासुंदे ता.पारनेर शिवारात काल दुपारपासुनच पोलीसांनी आरोपींची नाकाबंदी केली होती. अखेर घारगाव पोलिस आणि पारनेर पोलिसांच्या संयुक्त पथकाने वासुंदे गावापर्यंत त्यांचा पाठलाग केला. रस्ताच संपल्याने दरोडेखोरांनी आपल्या दोन्ही दुचाकी सोडून देत डोंगरातून पळ काढला. त्यातच रात्र झाल्याने तपास पथकासमोर अडचणी निर्माण झाल्या. या दरम्यान पोलिस अधीक्षक राकेश ओला, गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांनी साकूरला भेट देत स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू केला. घारगाव, पारनेर आणि गुन्हे शाखेच्या पथकांनी दरोडेखोरांनी दुचाकी सोडल्या तेथून डोंगर दर्या खोऱ्यात तपास सुरू केला त्यांना स्थानिक गावकऱ्यांनीही साथ दिली आणि अखेर रानात दडून बसलेला एक जण भल्या सकाळी पोलिस आणि ग्रामस्थांच्या हाती लागला, तर त्यानंतर काही वेळातच दुसराही सापडला. सध्या या दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून उर्वरित तिघांसह चोरुन नेलेला मुद्देमाल शोधण्याचे काम सुरू आहे. संपूर्ण तालुक्यात खळबळ उडवून देणाऱ्या या घटनेनंतर अवघ्या १८ तासांतच पोलिसांनी पाच दरोडेखोरांपैकी दोघांना ताब्यात घेण्यात यश मिळवल्याने परिसरातून पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.



## उद्यापासून घरबसल्या मतदान; जिल्ह्यात २ हजार ६८८ गृह मतदार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** वृध्द, दिव्यांग व्यक्तींनी केलेल्या मागणीनुसार त्यांच्या घरी जाऊन, घरबसल्या मतदान पध्दत अहमदनगर शहर मतदारसंघात (१४३ मतदार) शनिवार आणि रविवारी राबण्यात आली. उर्वरित जिल्ह्यातील ११ मतदारसंघांत गुरूवार १४ तारखेपासून १६ नोव्हेंबर तीन दिवस गृह मतदानाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. जिल्ह्यातील २ हजार ६८८ जणांनी घरबसल्या मतदान करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या गृह मतदानासाठी १९५ रुट प्लन करण्यात आली असून त्यासाठी १३७ पथके तयार करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने देण्यात आली. निवडणूक आयोगाने ८५ वर्षाहून अधिक तसेच दिव्यांग व्यक्तींना घरबसल्या मतदानाची सुविधा उपलब्ध केली आहे. मात्र त्यासाठी संबंधित मतदाराने तशी लेखी पूर्व इच्छा व्यक्त करायला हवी. जिल्ह्यात ८० ते ९० वयाचे ९२ हजार ६७१, ९० ते १०० वयोगटातील १९ हजार ७७२ तर ११० पर्यंत वय असलेले १ हजार ६६३, तसेच ११० वयाचे १ तर १२० वयापर्यंतचे १ वृध्द व्यक्ती आहेत. त्यांच्यासह दिव्यांगांना ही सुविधा देण्यात आली आहे. यातील जिल्ह्यातील २ हजार ६८८ जणांनी घरबसल्या मतदान करण्यास पसंती दिली आहे. गृह मतदानसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणेने १३७ पथके तयार केली आहेत. या पथकामध्ये २ मतदान अधिकारी, एक सूक्ष्म निरीक्षक, पोलीस, व्हिडिओग्राफर, मदतनीस यांचा समावेश आहे. ही पथके कोणत्या मार्गाने मतदारांच्या घरी जाणार यासाठी १९५ मार्गिका ठरवून देण्यात आल्या आहेत. या मार्गिकेवरून मतपत्रिका घेऊन धावणार्या वाहनांना जीपीएस प्रणाली बसवण्यात आली आहे. त्यामुळे मार्गिका सोडून जाणार्या वाहनांना प्रतिबंध बसणार आहे. उमेदवार व त्याच्या प्रतिनिधीला मतदानावेळी उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासाठी पथक कोणत्या वेळेला मतदारांच्या घरी पोहचेल,याची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार आगाऊ कळवण्यात आले आहे. त्यावेळी पथक मतदारांच्या घरी मतदान कक्ष निर्माण करून मतदान करून घेईल. यासाठी मतपत्रिका उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मतदान प्रक्रिया झाल्यानंतर त्याच दिवशी सर्व मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकारी स्ट्रॉगरूममध्ये जमा करणार आहेत.

# माझे मतदान; हीच माझी देशसेवा

## संपादकीय



### पक्षीतज्ज्ञ डॉ.सलीम अली


आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन माम ांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे म ार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडम ध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर – कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यंन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले.

**डॉ.सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!**

---

मतदानाचे महत्व– मी एकट्याने मतदान केलं नाही तर काय फरक पडणार आहे? मतदानानिमित्त सुट्टी आहे ना? मग आपण या सुट्टीचा खुप आनंद उपभोगुया, कुठेतरी सहलीला जाउया, महाराष्ट्र दर्शनला जाऊ चला...! हे विचार म्हणजे नाकर्ते पणाचा कळस होतात. पण थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका–एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी, नको असलेले सरकार उलथून टाकण्यासाठी, विकास पुरुषास पुढे आणण्यासाठी, आपल्या मनातील सरकार खेचून आणण्यासाठी, आपली प्रगती वेगाने साधण्यासाठी आदी अपेक्षांना मूर्तरुप देण्याकरिता आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो, ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. अभी नही तो कभी नही; पस्तावे की बारी यही! असे लक्षात घ्यावे.

दरवर्षी १५ ऑगस्ट– स्वातंत्र्यदिन, २६ जानेवारी– प्रजासत्ताक दिन आणि १ मे– महाराष्ट्र दिन या दिवशी प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती ओसंडून वाहते. याचपद्धतीने ध्वजदिन निधी संकलनासही जनता सढळहस्ते मदत करते. नैसर्गिक आपत्ती असो किंवा युद्धजन्य परिस्थिती, प्रत्येक भारतीय नागरिक देशप्रेमाने भारावून जाऊन मदतीसाठी पुढे सरसावतो व आपल्या परिस्थितीनुसार मदत करतो. तद्वतच मतदानाबाबतही लोकांच्या मनात अशी कर्तव्यभावना चेतविण्याची नितांत गरज आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. सर्वच जिल्ह्यात या विशेष दिनानिमित्त ८ नोव्हेंबरपासून




जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुकास्तरावर तसेच जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येच्या गावात प्रभातफेरी आयोजन, जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व ज्युनियर कॉलेज मधून युवक–युवतींसाठी मतदान करणे का गरजेचे या विषयावर प्रबोधन करणारी व्याख्याने, निबंध स्पर्धा, शाहीरांच्या पोवाड्यातून जनजागरण आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

विशेषत: १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक–युवतींना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे, या अनुषंगाने मतदान जागृती बाबत तरूणाईला जास्तीत जास्त प्रोत्साहित करण्यावर भर दिला जाणार आहे. यंदाच्या २०२४च्या वर्षी आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे भारत निवडणूक आयोगाने निवडणूकीसाठी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला मतदान करण्याच्या किंवा त्यांनी मतदानाचा हक्क बजवावा या प्रक्रीयेत शंभर टक्के सहभागी करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या सर्वांना टपाल मत पत्रिका, निवडणूक कार्य प्रमाणपत्र यांच्या सहाय्याने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. यापूर्वी निवडणूक प्रक्रियेत गुंतल्यामुळे बहुतांशी अधिकारी व कर्मचारी मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहात असायचे, पण आता यंदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. बहुतेक सर्व मतदारांना मतदान ओळखपत्रे देण्यात आली आहेत. दुबार म तदार नोंदणी झालेल्यांची नावे वगळण्याची व उर्वरित मतदारांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनाच्या वतीने युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच तरूण मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी इंटरनेटच्या, फेसबूक व व्हॉटस्अप सारख्या सोशल मीडियाचाही मोठ्या प्रमाणात वापर करण्याचे निवडणूक विभागाचे नियोजन आहे. या निमित्त दि.८ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२४पर्यंत सर्व जिल्ह्यात मतदार जागृती सप्ताह आयोजित केला गेला आहे. मतदारांनी भविष्य काळात येणाऱ्या निवडणूकीमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावून एक सार्वभौम शक्तीशाली लोकशाही राष्ट्र उभारण्यास आपले मतदानाच्या स्वरूपात सहकार्य लाभावे हीच छोटीशी अपेक्षा. शास्त्रज्ञ मंडळी आयुष्यभर अविश्रांत मेहनत घेऊन संशोधनाद्वारे मानवी जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. देशातील युवक–युवती सैन्यात विविध पदांवर कार्यरत राहून देशसेवा करतात. संरक्षण, संशोधन, कृषी विकास, उद्योग, याच बरोबर अगदी राष्ट्रीय सेवा दलाच्या व शालेय विद्यार्थी एनसीसी. माध्यमातून का असेना प्रत्येकजण आपआपल्या परीने देशसेवा करण्याचा प्रयत्न करीत असतो. मतदान करणे सुद्धा देशसेवेचाच एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव म दत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राथम्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. चला तर मग, कंबर कसून दृढ निश्चयाने मतदान करण्यास तयार राहू या!

**!! चला निर्धार करुया, मी यावेळी मतदान करणार म्हणजे करणारच !!**

**– संकलन व सुलेखन –**
**श्री. कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३**

---

# इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यश ही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण – उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मि ळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

---

## उपवर...

निवडणूकी सुकाळ
रे भर आश्वासनांवर
मुक्ताफळे मुक्त मुखे
वर्षाव जनमानसावर

दिसती नेते मंडळींना
लग्नाळू मुली उपवर
म्हणे जमवू सर्व लग्ने
मिळवूनदेणार मी वर

जोर फुकट वाटपांचा
दे फ्री अनेक एकावर
नाकावर टिच्चून देतो
अवजड नथ नाकावर

बोल घेवडे वाटत सुटे
कसाघालायचा आवर
वीज फ्री चोवीस तास
भले उपलब्ध न पॉवर

लक्ष्मीबिचारी दमूजाई
सटासटपैसे खात्यावर
बहीण दाजी माय बाप
रे लक्षकेंद्रीत नात्यांवर

मोबाईल फ्री सरिचार्ज
गल्लीत बांधतो टॉवर
पाणी नसू द्या धरणात
घराघरांत बसवू शॉवर

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

---

# ग्लोबल ह्यूमन राईट्सचे महाराष्ट्र राज्य डेप्युटी डायरेक्टर पदी प्रेमानंद सरकटे यांची नियुक्ती

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, ठाणे :** भारत सरकार मान्यता प्राप्त ग्लोबल ह्यूमन राईट्स प्रोटेक्शन फोरमच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या डेप्युटी डायरेक्टर या पदावर बुलडाणा जिल्ह्यातील रायपूर येथील प्रेमानंद तुकाराम सरकटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



गेल्या अनेक वर्षापासून नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीज नवी दिल्ली या संस्थेच्या बुलडाणा जिल्हा सचिव पदाची जबाबदारी सांभाळीत असताना प्रेमानंद सरकटे यांनी तळागळातील विधवा, निराश्रीत, परित्यक्त्या, अन्याय आणि अत्याचाराने पिडीत झालेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, वकील मिळवून देणे, पोलीस प्रोटेक्शन मिळवून देणे, इत्यादी कामे त्यांनी केली आहेत.

या कार्याची दखल घेऊन भारत सरकार म ान्यता प्राप्त ग्लोबल ह्युमन राईटस् प्रोटेक्शन फोरम चे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा चलो बुद्ध की ओर मिशन चे सर्वेसर्वा काशीरामजी पैठणे तसेच सदर संस्थेचे महाराष्ट्र राज्य डायरेक्टर डॉ. प्रकाश खंडागळे यांच्या प्रस्तावावरून प्रेमानंद सरकटे यांची म हत्वपूर्ण अशा महाराष्ट्र राज्य डेप्युटी डायरेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्याम ुळे सरकटे यांच्यावरील समाज कार्याची व्याप्ती वाढली आहे.

प्रेमानंद सरकटे यांना मिळालेल्या नियुक्तीम ुळे त्यांच्यावर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# कोपरी पाचपाखाडी परिसरात नागरिकांनी घेतली मतदानाची शपथ

**दि.१२, ठाणे :** १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील परबवाडी कोपरी येथे नवनियुक्त शिक्षण प्रशिक्षणात स्वीप अंतर्गत नुकतीच मतदान जनजागृती करण्यात आली. उत्सव निवडणुकीचा.. अभिमान देशाचा.. माझे मत.. माझा अधिकार असे जनजागृतीपर फलक हातात घेवून शालेय विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये जनजागृती केली.




महाराष्ट्रात निवडणुकीचा उत्सव सुरू असून या उत्सवात आपणही आपले अम ूल्य मत देवून सहभागी व्हावे व लोकशाही बळकट करण्यासाठी आपले योगदान द्यावे, अशी जनजागृती नागरिकांमध्ये करण्यात आली. तसेच त्यांना मतदानाची शपथ देण्यात आली.

शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील पालकांना, कुटुंबियांना तसेच आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचे आवाहन करु, असा निर्धार यावेळी विद्यार्थ्यांना व्यक्त केला. यावेळी नोडल अधिकारी श्री.कमलाकांत म्हेत्रे यांच्यासह स्वीपचे सदस्य उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

३ अक्षराज बुलडाणा, बुधवार, दि.१३ नोव्हेंबर २०२४ संमिश्र

# थोडक्यात

## नारदखेरकी गावात मनसे सैनिकांचा झंझावात



अक्षराज : उदय दणदणे

**दि.१२, चिपळूण :** गुहागर विधानसभा मतदार मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांचा कळंबट जिल्हा परिषद गट नारदखेरकी गावात प्रचार करताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना उप.तालुका अध्यक्ष संतोष हातीसकर नारदखेरकी शाखाध्यक्ष संदीप आंबवकर, महाराष्ट्र सैनिक सागर झगडे, निकेतन हातिसकर, सुजल मयेकर, संकीर्ण मयेकर, प्रशांत चव्हाण, रुपेश मोहिते व इतर महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. याठिकाणी ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे अधिक माहिती देताना उप.तालुका अध्यक्ष संतोष हातीसकर यांनी सांगितले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन मुकूटबन येथे विद्यार्थी दिवस साजरा



अक्षराज : राजू गागरे

**दि.१२, झरी (यवतमाळ) :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन मुकूटबन येथे विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. दिलीप देवंतवार यांनी दिलेल्या माहितीनुसार यावेळी कार्यक्रम चे अध्यक्ष देवंतवार सर यांनी विद्यार्थ्यांना या दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विध्यार्थी जीवनाचे उदबोधक असे मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन नवयुवक कार्यकारी मंडळाने आयोजित केला. या मंडळातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मिळून परिसरातील अनेक विध्यार्थ्यांना पेन, नोटबुक, चित्रकला वही, कंपास इत्यादी शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करून, अतिशय प्रेरणादायी असा उपक्रम राबविला. यावेळी उपस्थित पालकांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.

## ठाणे जिल्ह्यात दि.११ नोव्हेंबर पर्यंत २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दि.११, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगामार्फत आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहिता काळात नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येते. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून दि.११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू / दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

## निवडणूक पार्श्वभूमीवर बाणकोट सागरी पोलीस ठाणे (वेसवी) पोलिसांचा रूट मार्च



अक्षराज : उमेश तबीब

**दि.११, दापोली (रत्नागिरी) :** विधानसभा निवडणुकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. त्यासाठी पोलीस बंदोबस्त राहणार आहे. त्या अनुषंगाने बाणकोट सागरी पोलीस ठाणे (वेसवी) या स्तरावर मोठ्या फौज फाट्यासह पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रूट मार्च काढण्यात आला. बाणकोट पोलीस ठाण्याच्या हद्दी मधील बाणकोट, वाल्मिकी नगर, वेसवी, आशा अनेक महत्त्वाच्या हद्दी मधून रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्च मध्ये केंद्रीय पोलीस दलाचे जवान, होमगार्ड, दंगा नियंत्रण पथक, शीघ्र कृती दलाचे जवान व पोलीस स्टेशनचे इतर अधिकारी व अमोलदारांचा समावेश होता. कायद्याचे पालन करत प्रशासनाला सहकार्य करावे, कोणतीही व्यक्ती जातीचा तेढ निर्माण करणार नाही याची सर्वांना दक्षता घ्यावी, वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर लावून आचारसंहितेचा भंग करून कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे प्रयत्न करत असेल तर संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## श्रीराम अप्पा काचावार यांचे निधन



अक्षराज : प्रतिनिधी

**दि.१२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील ज्येष्ठ व्यापारी तथा कालेजी देवी मंदिर संस्थान चे विश्वस्त श्रीराम विठोबा काचावार यांचे दि ११ नोव्हेंबर रोजी रात्री वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले व पाच मुली नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर दि .१२ नोव्हेंबर रोजी मुदखेड येथे दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. व्यापारी गिरीश काचावार व प्रविण काचावार यांचे ते वडील होत.

# ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीती धडाकेबाज ऑल आऊट ऑपरेशन...

अक्षराज : विनोद वास्कर

**दि.१२, ठाणे :** विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने ठाणे हद्दीत शनिवारी(९ नोव्हेंबर रोज रात्री ११ ते रविवार १० नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजेपर्यंत गुन्हे शाखेच्या पाच परिमंडळ आणि वाहतूक विभागाद्वारे ३१२ अधिकारी आणि १ हजार २८८ पोलीस अंमलदार यांनी केलेल्या ऑल आऊट ऑपरेशन मध्ये अवैध दारूचे ५७ गुन्हे , ३१ गावठी कट्टे, ७ कोयते, आणि ५ तलवारी अशी ४३ हत्यारे जप्त करीत १८५ आरोपींवर गुन्हे दाखल करण्याची कामगिरी करण्यात आली.

ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी आणि अंबरनाथ परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करून त्यांची पोलिसांनी चौकशी केली. या ऑपरेशन वेळी अवैद्य शस्त्र बाळगणाऱ्या ४१ आरोपींना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. यावेळी ३१ गावठी कट्टे, ७ कोयते, ५ तलवारी असे हत्यार जप्त करण्यात आले. तर तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कोटपा कायद्यानुसार १७९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. त्याव्यतिरिक्त दारूबंदी कायद्यानुसार ५७ गुन्हे दाखल करण्यात येऊन १८५ जणांवर कारवाई करण्यात आली.

तर ५ लाख ७ हजार रुपये किम तीची दारू जप्त करण्यात आली. ड्रग विक्री व सेवन करणाऱ्या विरोधात धडक कारवाई मोहीम राबवण्यात येऊन १५ जणांवर कारवाई करण्यात आली. तब्बल ५ तास सुरू असलेल्या या मोहिमेत ७४ हॉटेल, ६४ लॉज, ३९ बियर बार, ४२ डान्सबार आदींची तपासणी करून झाडाझडती घेण्यात आली. तसेच ठाणे पोलिसांनी तडीपार केलेल्या ४७ गुंडांना अटक करण्यात आली. रेकॉर्डवरील ५९ हिस्ट्रीशिटर, ५० तडीपार, ३१ रेकॉर्डवरील गुंड अशा १४० गुंडांची तपासणी करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तर ठाणे शहर पोलिसांच्या वाहतूक शाखेने ऑल आऊट ऑपरेशनमध्ये १२१० लहान-मोठ्या वाहनांची तपासणी करण्यात आले. यावेळी २ हजार १४९ दोषी वाहन चालकांना १८ लाख ५८ हजार ७५० रुपये इतका दंड ठोठावला.

# माथेरान 'शिवसेना उबाठा' गटाला खिंडार...

अक्षराज : चंद्रकांत सुतार

**दि.१२, माथेरान :** माथेरान उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपशहर शाखाप्रमुख सागर पाटील व सचिन पाटिल, विभाग प्रमुख दिनेश कदम याचा मोठा मित्र परिवाराने शहर प्रमूख चंद्रकांत चौधरी सम्पर्क प्रमुख मनोज खेडेकर याच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना शिंदे गटात आज पक्ष प्रवेश केला आहे. महायुतीचे लोकप्रिय उमेदवार महेंद्र थोरवे यांच्या प्रचाराची सुरुवात पक्षप्रवेशानेच सुरू झाली ती आजही महायुतीच्या सर्व शिलेदारांनी प्रचारात पक्षप्रवेशानेच जोरदार मुसंडी मारली आहे.



दिवसेंदिवस शिंदे गटाच्या नेतृत्वावर माथेरानकारांचा विश्वास दृढ होताना दिसत आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघ सन २०२४ च्या निवडणुकीत महायुतीचे लोकप्रिय उमेदवार महेंद्र थोरवे यांना तिकिट जाहीर झाले त्यावेळी म हायुतीचा धर्म न पाळता सुधाकर घारे यांनी अपक्ष उमेदवारी जाहीर केली तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी नितीन सावंत यांची उमेदवारी जाहीर केली होती. सुरवातीला माथेरान उभाठा गटाचे शिवसैनिक नितीन सावंत यांना तिकिट मिळण्यासाठी आग्रही होते.

त्यांच दरम्यान सुधाकर घारे यांनी राष्ट्रवादी पक्षाचा पदाचा राजीनामा देत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माथेरान शिवसेना(उबाठा) पक्षाने स्वतःचा स्वतंत्र अधिकृत उमेदवार नितीन सावंत असताना ह्या तिरंगी लढतीत नितिन सावंत तिसऱ्या नंबरला जातील असे भास्य करून विजयी होणारे उमेदवारांना सुधाकर घारे यांना सहकार्य करण्याची भूमिका घेऊन सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मातोश्रीवर या सर्व शिवसैनिकांना बोलावून तुमचे राजीनामे नामंजूर केले. तुम्ही सेनेचेच काम करा म्हणून आदेश दिले होते. या तळ्यात मळ्यात वृत्तीचे संपूर्ण कर्जत तालुक्याचे खळबळ माजली होती. ह्या घडामोडी होत असताना तळ्यामळ्यातील कार्यकर्त्यांना हा धर सोड वृत्तीचा निर्णय अजिबात पडला नव्हता. त्यामुळे म थेरान उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मोठा असंतोष पसरला आहे. त्याचाच परिणाम आज निवडणुकीच्या तोंडावर म थेरान उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना ला मोठे खिंडार पडले आहे. उपशहर प्रमुख ते सागर पाटील विभाग प्रमुख सचिन पाटील नागेश परेरा, दिनेश कदम, जितेश पार्टी, निहाल चव्हाण, करण वाघेला, रितेश गायकवाड, आशिष शेलार, महेश शिंदे, संतोष गायकवाड, निखिल बहादुर, आकाश बहादुर, अक्षय बहादूर, प्रेम काळे, अक्षय कदम, नीरव रोड्रिक्स, तेजस रोड्रिक्स, जिमी रोड्रिक्स, प्रथमेश पाटील, जयेश पाटील, सिद्धेश पाटील, कल्पेश वाघेला, रमेश बॉम्बे, शैलेश वाघेला, रितेश शिंगे, रफिक पटेल सिद्धेश शेलार, सतीश शेलार, ऋषी वागेला, अतुल चव्हाण, अमोल गायकवाड, किरण पांचाळ, शुभम म्श्राम, आसिफ शेख, अमोल सकपाळ, महेश काळे असे ४० कुटुंबप्रमुखांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. त्यामुळे माथेरानमध्ये शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढली असून आम दार महेंद्र थोरवे यांना जास्तीत जास्त मतदान देण्याचे आश्वासित केले आहे.

# भगवान श्री कार्तिक स्वामींचे दर्शन...

**- दिलीप देशपांडे**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**मोबा.नं.८९९९५६६९१७**

कार्तिक महिन्यात पौर्णिमा आणि कृत्तिका नक्षत्र या तिन्ही गोष्टी जेव्हा एकत्र येतात म्हणजे कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ज्या काळात कृत्तिका नक्षत्र असेल तेव्हा भगवान श्री कार्तिकस्वाम ींचे दर्शन घेण्यास शुभकाळ असतो असे मानले जाते.

कार्तिक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. दर महिन्याला येणाऱ्या पौर्णिमेला विशेष महत्त्व असले तरी कार्तिक महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी देव दिवाळी साजरी केली जाते.

हिंदू पंचांगानुसार कार्तिक म हिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला देवउठणी एकादशी साजरी केली जाते. या दिवशी श्रीविष्णूची पूजा केली जाते. या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांच्या योगनिद्रेतून जागे होतात. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी या स्नान केल्याने जीवनात आनंद मिळतो. तसेच जीवनात सुख, शांती आणि समृद्धी येते. यावेळी कार्तिक पौर्णिमेला अनेक शुभ योग तयार होत आहेत. या दिवशी दान केल्यानेही विशेष लाभ होतो.

कार्तिक महिन्यातील पौर्णिमा तिथी १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी सुरु होईल. कार्तिक महिन्याची पौर्णिमा तिथी १५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री २ वाजून ५९ मिनिटांनी संपेल. परंतु कार्तिक स्वामींचे दर्शनाचा योग हा रात्री ९ वाजून ५५ मिनिटा पासून ते पहाटे २ वाजून ५९ मि निटांपर्यंत आहे त्या काळात सगळ्यांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घ्यावे ( कार्तिक महिना- पौर्णिमा; आणि कृतिका नक्षत्र या काळात आहे)

भगवान श्री कार्तिकस्वामी हे बल, बुद्धी, साहस, आणि यशस्वीतेचे प्रतीक मानले गेले आहे, तसेच त्यांना शिवगणांचा सेनापती म्हटले जाते. म्हणजेच ज्ञान, संपन्नता, यशस्विता, आणि इतर सर्व शुभ गुणांचे अधिपत्य श्री कार्तिकस्वामीं यांचेकडे आहे. आणि म्हणूनच या काळात पर्वणी काळात त्यांचे दर्शन घेणे अतिशय शुभ मानले गेले आहे आणि हे दर्शन घेणे तर संपत्ती कारक असेही म्हटले जाते.

कार्तिक स्वामींचे दर्शन घेतल्यानंतर येणारे वर्ष हे धनसंपत्ती च्या दृष्टीने लाभदायक जाते असा अनेकांचा अनुभव आहे. आपल्याला असलेली आर्थिक अडचण दूर होते तसेच असलेले कर्ज या पर्वणी काळात दर्शन घेतल्यास फेडली जातात कर्जमुक्त होतात. वर्षभरात जरी भारतीय दर्शन पौराणिक संदर्भानुसार स्त्रियांसाठी वर्ज्य असले तरी मात्र या काळात स्त्रिया देखील भगवान कार्तिक स्वामींचे दर्शन घेऊ शकतात ही विशेष बाब आहे. कार्तिक स्वामींचे दर्शन घेताना ज्यांना जे जे शक्य असेल ते करावे व त्या वस्तू अर्पण कराव्यात. दर्शनाचे वेळी त्यांना पाण्याने भरलेला कमंडलू, २७ रुद्राक्षाची माळ, कमळाचे फुल किंवा कोणतीही पांढरी फुले अर्पण करावेत. आरती करावी.मोरपीस वहावे. मनातील ईच्छा सांगून प्रार्थना करावी. या काळात विद्यार्थ्यांनी यशासाठी प्रज्ञाविवर्धन स्तोत्र जितक्या वेळा म्हणता येईल तितक्या वेळा पण शक्यतो अकरा वेळा तरी म्हणावे. या काळात किंवा त्या दिवशी मद्यपान महासाहार वर्ज करावे व ब्रह्मचार्य पालन करावे.

कुठे कुठे आहेत कार्तिक स्वामींची मंदिरे...

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भगवान कार्तिक स्वामीची मंदिर आहेत. त्यात जळगाव निवृत्ती नगर भागात, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान,जळगांव, पिंपराळा, जळगाव. ऑर्डनन्स फॅक्टरी वरणगाव जिल्हा जळगाव, अम ळनेर,जि.जळगांव. शिरपूर,जि.धुळे. छत्रपती संभाजी नगर, पर्वती, पुणे. हडपसर,पुणे. पनवेल, पुणतांबा. नगर.



राजगुरुनगर. नाशिक. अंजनेरी. ठाणे. उल्हासनगर. अचलपूर. मुर्तीजापूर. नागपूर. कुरुंदवाड, जिल्हा सांगली. कराड, जिल्हा सातारा. रहिमतपूर, जिल्हा सातारा. पिरवाडी जिल्हा सातारा, राजापूर जिल्हा रत्नागिरी, मुळदे तालुका कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग, पंचगंगेच्या तीरावर आणि श्री महालक्ष्मी मंदिराच्या आवारात कोल्हापूर, डोंबिवली वसई या ठिकाणी तसेच बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव जवळ घाटपुरी येथे कार्तिक स्वामींचे पुरातन मंदिर आहे वर पंचमुखी हनुमान मंदिर आणि खाली गाभाऱ्यात कार्तिक स्वामींचे मंदिर आहे. वर्षात फक्त एकदाच कार्तिक पौर्णिमेला हे मंदिर उघडण्यात येते.

**पुराणातील कार्तिक स्वामींची नावे..**

१. कार्तिकेय २. महासेन ३. शरजन्मा ४. षडानन

५. पार्वतीनन्दन ६. स्कन्द ७. सेनानी ८. अग्रिभू

९. गुह १०. बाहुलेय ११. तारकजित्

१२. शिखिवाहन १३. शक्तिश्वर १४. कुमार १५. क्रौञ्चदारण १६.आग्नेय १७. मयुरकेतु १८.धर्मात्मा

**...अशी अजूनही नावे आहेत.**

श्री कार्तिक स्वामी परिवार...

पिता - भगवान शिव, माता - भगवती पार्वती

भाऊ - गणेश (छोटा भाऊ), बहीण - अशोका सुंदरी

पत्नि - देवसेना आणि कुरुवल्ली, वाहन - मोर

प्रज्ञाविवर्धन स्तोत्र

अस्य श्रीप्रज्ञाविवर्धन-स्तोत्र-मंत्रस्य सनत्कुमारऋषि:।

स्वामी कार्तिकेयो देवता। अनुष्टुप् छंद:।

मम सकल विद्यासिद्ध्यर्थं जपे विनियोग:।

श्रीस्कंद उवाच।।योगीश्वरो महासेन: कार्तिकेयोऽग्निनन्दन:।

स्कंद:कुमार: सेनानी: स्वामि शंकरसंभव: ।।१।।

गांगेयस्ताम्रचूडश्च ब्रह्मचारि शिखिध्वज:।

तारकारिरुमापुत्र: क्रौंचारिश्च षडानन: ।।२।।

शब्दब्रह्मसमुद्रश्च सिद्ध:सारस्वतो गुह:।

सनत्कुमारो भगवान् भोगमोक्षफलप्रद: ।।३।।

शरजन्मा गणाधीशपूर्वजो मुक्तिमार्गकृत्।

सर्वागमप्रणेताच वांछितार्थप्रदर्शन: ।।४।।

अष्टाविंशति नामानि मदीयानीति य: पठेत्।

प्रत्यूषं श्रद्धयायुक्तो मूको वाचस्पतिर्भवेत् ।।५।।

महामंत्रमयानीति मम नामानुकीर्तनम्।

महाप्रज्ञामवाप्नोति नात्र कार्या विचारणा ।।६।।

।। इति श्री प्रज्ञाविवर्धन स्तोत्रं संपूर्णम्।

त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाला भगवान शंकराने याच दिवशी ठार केले होते, म्हणून या पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हणतात. या दिवशी शिवमंदिरात ७५० वातीची त्रिपुरारी वात लावली जाते. तसेच घरोघरी, मंदिरात दिव्यांची आरास केली जाते. नदी पात्रात दिवे सोडले जातात. घाटावरही दिव्यांची आरास करुन आनंदोत्सव साजरा करतात. तुळशीच्या लग्नाचा हा शेवटचा दिवस असतो.

# राणीताई लंकेंच्या प्रचारासाठी महिलांनी खोचला पदर

## भगिनींचा गृहभेटीवर भर; महिलांची उपस्थिती लक्षणीय

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** अहिल्यानगर तालुक्यातील देहरे परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई निलेश लंके यांच्या प्रचारात आता महिलांनी प्रचार यंत्रणा सुरू केली आहे.

महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या धुमधडाक्यात शुभारंभ केला असून परिसरातील गावे, वाड्या वस्त्या पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



या प्रचार शुभारंभ प्रसंगी खासदार निलेश लंके यांची पुतणी अक्षदा लंके, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या नगर तालुका अध्यक्षा डॉ.मधु कदम, निर्मला काळे, शुभांगी काळे, वर्षा काळे, माजी पंचायत समिती सदस्य व्ही.डी.काळे पाटील, अरुण लांडगे पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार निलेश लंके यांचे देहरे परिसरावर विशेष प्रेम असून या परिसरातील नागरिकांच्या सुख दुःखात ते नेहमी धावून येत असतात. या परिसरातील विकास कामांसाठी त्यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या

उमेदवार राणीताई लंके यांना मोठे मताधिक्य देहरे परिसरातून देवू असा विश्वास यावेळी महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात

## विंचूर येथे संतश्रेष्ठ नामदेव महाराजांची जयंती उत्सव साजरा




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांची ७५४ वी जयंती विंचूर येथील संत नामदेव महाराज मंदिरात यथासांग पार पडली. सकाळी ६:०० वा. संत नामदेव महाराजांच्या मूर्तीवर शोडोशोपचारे महाअभिषेक शिंपी समाजाचे अध्यक्ष किरण नवले यांच्या हस्ते सह पत्नीक करण्यात आला. नंतर काकडा - आरती, भजन व अल्पोहार म्हणून फराळाचे पदार्थ देण्यात आले. हा भारतातील एक महत्वाचा सांस्कृतिक उत्सव साजरा केला जातो. संत नामदेव हे १३ व्या शतकातील भारतीय संत, कवी आणि समाजसुधारक होते. ज्यांनी मराठी साहित्य आणि भक्ती चळवळीला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नामदेव जयंती हा उत्सव साजरा करणे म्हणजे त्याच्या जीवन, शिकवणी आणि वारसा यांचा उत्सव आहे. हे त्यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने दरवर्षी भारतातील शिंपी समाज बांधव मोठ्या आदराने साजरा करत असतात.

विशेषत: महाराष्ट्रात या दिवशी, भक्त आणि अनुयायी संत नामदेव यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांच्या आठवणी करून घेतात, त्यांच्या कविता आणि भजनांचे पठण करतात आणि त्यांच्या शिकवणींचा विचार करतात. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन आणि संगीत कार्यक्रम आयोजित केले जातात. नामदेव जयंती हा सांस्कृतिक वारसा आणि अध्यात्मिक मूल्यांचा उत्सव आहे. जो लोकांना त्यांच्या जीवनात जातिभेद आणि भेदभाव न करता सर्वांशी एकता आणि करुणेने वागण्याची शिकवण देतो.

यावेळी मंदिरात शिंपी समाज बांधव देविदास कल्याणकर, ज्ञानदेव कल्याणकर, कृष्णा कल्याणकर, गोविंद कल्याणकर, सोमनाथ कल्याणकर, संतोष पांडुरंग कल्याणकर, मास्टर खैरनार, महाजन सर, भगवान बकरे, किरण नवले, विजय क्षिरसागर, अरुण कल्याणकर, सतीश कल्याणकर, सुनील क्षिरसागर, योगेश खर्डे, अनिल कल्याणकर, संजय बोढाई, दत्तात्रय करमासे, मंगेश करमासे, रत्नाकर क्षिरसागर, कैलास कल्याणकर, दत्तात्रय कल्याणकर, पुरुषोत्तम कल्याणकर, भजन करी आणि महिला भगिनी आदी भाविक उपस्थित होते.

# निवडणूक विशेष पोलीस निरीक्षकांनी घेतला कोकण विभागातील निवडणूक तयारीचा आढावा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोकण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांच्या तयारीचा आढावा आज निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीदरम्यान घेतला. निवडणूकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून या कर्तव्यात कोणतीही कसूर राहणार नाही. या दृष्टीने विधानसभा सार्वत्रिक निवडणूका शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सर्व जिल्ह्यातील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस प्रशासन यांनी सतर्क राहण्याचे आदेश देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना बैठकीत दिल्या.

आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक यांनी कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांतील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग येथील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

सुरूवातीला ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रे, मतदानाची तयारी याबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. तसेच कोकण विभागातंर्गत इतर जिल्ह्याबाबतही त्यांनी जाणून घेतले.



प्रत्येक जिल्हयात तयार करण्यात आलेल्या कंट्रोल रुमच्या माध्यमातून मतदानाच्या एक दिवस आधी १९ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रियेची अभिरूप चाचणी घेण्यात यावी, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळता येतील. मतदान केंद्रावर मतदानासाठी येणारे उमेदवार हे मतदान झाल्यानंतर मतदान केंद्राच्या बाहेर १०० मीटर परिसरात रेंगाळणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे श्री.मिश्रा यांनी नमूद केले. मतदान केंद्रावर येणाऱ्या वयोवृद्ध मतदारांसाठी जास्तीत जास्त व्हीलचेअर उपलब्ध करण्यात याव्यात, जेणेकरुन मतदारांना मतदान केंद्रावर ताटकळत उभे रहावे लागणार नाही, यासाठी आपल्या विभागातील रुग्णालय, सेवाभावी संस्थांशी संपर्क साधून व्हीलचेअरची पुरेशी उपलब्धतता प्रत्येक मतदान केंद्रावर करण्यात यावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. एखाद्या मतदान केंद्रावर मशीनमध्ये काही तांत्रिक अडचण निर्माण होवून मतदान प्रक्रिया थांबली किंवा अन्य काही अडचण उद्धवली तर त्याचे वृत्त हे दिवसभर विविध वाहिन्यांवर दाखवले जाते.

त्या ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाल्यावरसुध्दा ती बातमी तशीच सतत सुरू असते याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती घेवून संबंधित वाहिन्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती तात्काळ कळविण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, जेणेकरुन निवडणूक विभागाची बदनामी होणार नाही, या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी सूचनाही श्री. दीपक मिश्रा यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व ठिकाणी भरारी पथकाच्या माध्यमातून सुरू असलेली वाहनांची तपासणी देखील काटेकोरपणे करण्याचे निर्देश निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी पोलीस प्रशासनाला दिले. कोकण विभागातील सर्व जिल्हयांची मतदानाची तयारी ही अंतिम टप्प्यात असून एखादी समस्या उद्धवल्यास तात्काळ निवडणूक आयोगाशी समन्वय साधावा असे नमूद करीत त्यांनी निवडणूका नि:पक्षपातीपणे व निर्भयपणे पार पाडण्यासाठी सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

## २० नोव्हेंबरला सर्व आस्थापनांना सुट्टी

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१२, ठाणे :** येत्या २० नोव्हेंबर दिवशी विधानसभा निवडणुकीचे मतदान असल्याने उद्योग विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना मतदानाची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी ही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाने या संदर्भातील सूचना जारी केली आहे. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मधील कलम १३५ (ब) नुसार, निवडणुक क्षेत्रातील कोणताही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनात काम करणाऱ्या आणि विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीस मतदानादिवशी सुट्टी दिली जाईल.ही सुट्टी उद्योग विभागाअंतर्गत येणारे सर्व उद्योगसमूह, महामंडळे, कंपन्या, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांसाठी लागू आहे. तसेच पोटकलम (१) नुसार या सुट्टीमुळे संबंधित कर्मचा-यांच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही, अशी स्पष्ट सूचना करण्यात आली आहे.

# कोणत्याही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही : काशिनाथ दाते




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या गाव भेट प्रचार दौऱ्या दरम्यान वडगाव सावताळ येथे ते बोलत होते. महायुतीचे सर्व कार्यकर्ते माझ्याबरोबर आहेत. अन्याय सहन करू नका प्रतिकार केला करायला शिकले पाहिजे.

दबाव जुगारून लावा माझी उमेदवारीचा अन्यायाच्या विरोधासाठी आहे. सर्वसामान्य साठी आहे. पारनेर हा बुद्धिजीवी व सुसंस्कृत लोकांचा मतदारसंघ आहे. ही ओळख कायम राहावी शांतता प्रस्थापित व्हावी, विकासाचा गाडा रुळावर यावा यासाठी मी परिवर्तनाची हाक दिली आहे. सर्व घटकांना बरोबर घेऊन काम करण्याचा माझा स्वभाव आहे. कोणत्याही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडले जाणार नाही. पारनेरला पुन्हा विकासाकडे आणण्यासाठी माझी निवडणूक आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबाशेठ खिलारी, सभापती अरुण ठाणगे, डॉ. भाऊसाहेब खिलारी, नगरसेवक पै. युवराज पठारे, मा. सरपंच शिवाजी खिलारी, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, उपतालुका प्रमुख पंढरीनाथ उंडे, सरपंच सुभाष ठाणगे, चेअरमन बाबासाहेब दाते, उद्योजक बाळासाहेब रोकडे, बी. टी. खामकर, अशोक रोकडे, निवृत्ती वाळुंज, प्रदीप वाळुंज, गीताराम वाळुंज, ग्रा. सदस्य बाळासाहेब वाळुंज, जयवंत वाळुंज, सखाराम मंचरे आदी मान्यवर उपस्थित होते.

> दाते सरांकडे गेल्या ४० वर्षाचा गाडा अनुभव आहे, ज्यांच्याकडे तालुक्याचे एक वेगळं स्वप्न आहे, ज्यांच्यामुळे पारनेर-नगर मतदार संघाचा भाग्य होणार आहे. वकृत्व, दातृत्व आणि कर्तृत्व ही त्रिसूत्री दाते सरांकडे आहे. गोरगरिबांचे कैवारी आहे. महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय आहे, गेल्या पन्नास वर्षांत कोणत्याही सरकारने वारकऱ्यांच्या दिंडीला पैसे दिले नाहीत परंतु आताच्या सरकारने दिंडीला २० हजार रुपये दिले, गो-मातेला राजमाताचा दर्जा दिला. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला, म्हणून महायुतीचे उमेदवार दाते सरांना मतदान करा.
>
> **- ह.भ.प. बाबासाहेब शिंदे (सरपंच, वडगाव सावताळ)**
>
> महिला सक्षमीकरणाचे काम या महायुती सरकारने केलं. मा. अजित दादा पवार व पालकमंत्री राधाकृष्ण विखे साहेबांनी अतिशय चांगला सुसंस्कृत उमेदवार आपल्याला दिला आहे. तालुक्यात जर आपल्याला उद्योगधंदे आणायचे असतील, तालुक्यात युवकांना सुशिक्षित होऊन रोजगार मिळवायचा असेल तर निश्चितपणे आपल्याला दाते यांना निवडून दिल्याशिवाय पर्याय नाही. आपल्या सर्व योजना चालू ठेवायच्या आहेत. आपल्या युवकांना उद्याचं भविष्य द्यायचं आहे. यासाठी दाते यांनाच मतदान करा.
>
> **- डॉ.भाऊसाहेब खिलारी**

## घरोघरी माहितीपत्रके वितरीत करून मतदान करण्याचे आयुक्तांचे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** मतदानाविषयी आवश्यक माहिती उपलब्ध होऊन एकही मतदार मतदान करण्यापासून वंचित राहू नये यादृष्टीने मतदान विषयक आवश्यक माहिती देणारे माहिती पत्रक घरोघरी वाटप करण्यात येत आहे. या माहिती पत्रकाचे अनावरण नुकतेच महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी दोन्ही विधानसभा संघाचे स्वीप नोडल अधिकारी अति. आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, १५० ऐरोली विधानसभा स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे पाटील, १५१ बेलापूर विधानसभा स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्त सागर मोरे उपस्थित होते. या माहितीपत्रकावर तरुणाईला तसेच सर्वच मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले असून मतदान करण्याचे महत्वही सांगण्यात आले आहे. तसेच या पत्रकावर वोटर हेल्पलाईन ॲपचे क्यूआर कोड प्रसिध्द करण्यात आले असून ॲन्ड्रॉइड व ॲपल अशा दोन्ही प्रकारच्या मोबाईल फोनसाठी स्वतंत्र क्यूआर कोड प्रसिध्द करण्यात आले आहेत. हा क्यूआर कोड स्कॅन करुन कोणताही मतदार आपले मतदार यादीतील नाव, आपला भाग क्रमांक, मतदार क्रमांक तसेच मतदार केंद्राचे ठिकाण ही माहिती अगदी सहजगत्या उपलब्ध करुन घेऊ शकतो. सदरची माहितीपत्रके आशा वर्कर तसेच अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत घरोघरी वितरीत केली जात असून प्रत्येकाने २० नोव्हेंबर रोजीच्या विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले जात आहे. त्याचप्रमाणे निवडणुकीसाठी नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत प्रत्येक मतदारापर्यंत त्याचा भाग क्रमांक, मतदार क्रमांक आणि त्याचे मतदान कोणत्या केंद्रावर आहे अशी संपूर्ण माहिती असलेली मतदार चिठ्ठी पोहचविली जात आहे. या माध्यमातून विधानसभा निवडणूक कार्यालयांप्रमाणेच नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीनेही मतदारांपर्यंत थेट पोहचून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

# रब्बी कांदा लागवड लाख हेक्टरने वाढणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** राज्यातील रब्बी हंगामातील कांदा लागवड क्षेत्र सरासरी साडेचार लाख हेक्टर आहे. यंदा लागवड क्षेत्रात एक लाख हेक्टरने वाढ होऊन रब्बीतील एकूण लागवड साडेपाच लाख हेक्टरवर जाण्याचा अंदाज आहे.

पावसाळ्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे आणि रब्बीसाठी पाण्याची उपलब्धता चांगली असल्यामुळे लागवड क्षेत्रात वाढीचा अंदाज आहे. रब्बी हंगामात दरवर्षी सुमारे साडेचार लाख हेक्टरवर कांदा लागवड होते. यंदा त्यात सुमारे एक लाख हेक्टरने वाढ होऊन सुमारे साडेपाच लाख हेक्टरवर लागवड होण्याचा अंदाज आहे. देशाच्या पातळीवरही रब्बी हंगामातील क्षेत्रात ८ ते १० टक्क्यांनी वाढ



होण्याचा अंदाज आहे. देशात एका वर्षात विविध हंगामात मिळून १०.८३ लाख हेक्टरवर लागवड होते, त्यात यंदा ८ ते १० टक्क्यांनी वाढ होऊन एकूण कांदा लागवड क्षेत्र १२ ते १३ लाख हेक्टरवर जाण्याचा अंदाज आहे.

राजगुरुनगर येथील राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्राचे प्रमुख विजय महाजन यांनी ही लागवड क्षेत्रात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रब्बीसाठी बाजारात बियाणांना मागणी जास्त होती. बाजारातील बियाणे संपले आहेत. त्यामुळे लागवड क्षेत्रात चांगली वाढ होण्याचा अंदाज असल्याचे महाजन म्हणाले.

नुकत्याच संपलेल्या खरीप हंगामातही कांदा लागवडीखालील क्षेत्र वाढले होते. गेल्या वर्षी देशभरात खरिपात ३.८ लाख हेक्टरवर कांदा लागवड झाली होती. यंदा त्यात एक लाख हेक्टरने वाढ झाली होती. खरीप कांद्याला काढणीच्या काळात अतिवृष्टीचा फटका बसला होता. कांद्याचे नुकसान झाले होते, तरीही लागवड क्षेत्रात झाल्यामुळे मार्चअखेरपर्यंत कांद्याची उपलब्धता चांगली राहील.